**महाराष्ट्र शासन**
**पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर**
वंजारी नगर पाण्याच्या टाकी जवळ, अजनी, नागपूर 440027
दुरध्वनी क्र. 0712-2743984 E-mail - sp.railways.nagpur@mahapolice.gov.in

---

क्रमांक : पोअलोना/आस्था/सेवाजेष्ठतासुची/२०२५ 1060 नागपूर, दिनांक 11 /०३/२०२५

विषय :- सेवाज्येष्टता सुची प्रसिध्द करणेबाबत.

----oo----

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७ मे २०२१ मधील (अ) दिनांक २५ मे २००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजु झाले असल्यास ते त्यांच्या दिनांक २५/०५/२००४ रोजीची सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व (ब) दिनांक २५ मे २००४ नंतर शासन सेवेत रुजु झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील असे तरतुद करण्यात आले असल्याने त्या अनुषंगाने दिनांक २५ मे २००४ च्या स्थितीनुसार, तसेच शासन निर्णय क्रमांक पीएमएन०८२१/प्र.क्र. ५३३/पोल ५ ब दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ मधील तरतुदीच्या अधिन राहुन सन २०२५-२०२६ ची पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उपनिरीक्षक, नाईक पोलीस शिपाई ते पोलीस हवालदार, पोलीस शिपाई ते पोलीस हवालदार या पदाच्या पदोन्नतीकरीता अंतिम सेवाजेष्ठता तयार करण्यात आली असुन सोबत अवलोकनार्थ पाठविण्यात येत आहे. (ई-मेल व्दारे सेवाजेष्ठता सुची पाठविण्यात आली आहे.)

महाराष्ट्र शासन गृहविभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/३८४३/प्र.क्र. ४६९/पोल ५ ब दिनांक २६ ऑक्टोंबर २०१७ मधील मुद्दा क्रमांक ५ अन्वये, राज्य पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यतच्या पोलीस कर्मचा-यांच्या घटक बदलीनंतर, बदली झालेल्या घटकात त्या पोलीस कर्मचा-यांची सेवाजेष्ठता, त्याची महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदावरील भरती दिनांक ग्राहय धरण्यात येईल. त्या दिनांकाच्या वर्षी, घटक बदली झालेल्या घटकात "पोलीस शिपाई" यांचे खाली निश्चित होईल. तसेच ज्या कर्मचा-यांचे एकापेक्षा अधीक वेळी घटक बदली करण्यात आलेली आहे. अशा पोलीस कर्मचा-यांची सेवाजेष्ठता देखील या निकषानुसार निश्चित होईल. अशी तरतुद करण्यात आल्याने, इतरत्र घटकातुन या जिल्हयामध्ये बदलीवर आलेले पोलीस अंमलदार यांची सेवाजेष्ठता, त्यांच्या भरतीच्या दिनांकाच्या वर्षी सर्वात शेवटच्या पोलीस अंमलदार यांच्या लगत निश्चित करण्यात आलेली आहे.

सर्व प्रभारी अधिकारी/सर्व शाखा प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्थ असलेल्या सर्व पोलीस अंमलदार यांना सदर सेवाजेष्ठता सुची बाबत अवगत करुन त्यांचा लावण्यात आलेला अनुक्रम याबाबत त्यांना अवगत करुन सदर यादीमध्ये त्यांच्या नावासमोर त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी. तसेच ज्या पोलीस अंमलदार यांना सदर सेवाजेष्ठता सुची संदर्भात काही आक्षेप असल्यास, काही दुरुस्ती सुचवायची असल्यास, त्यांच्या कडुन तसेच लेखी स्वरुपात घेवुन दिनांक २० मार्च २०२५ पर्यंत या कार्यालयास पोहचतील अश्या बेताने पाठविण्याबाबतची समज देण्यात यावी. विहीत मुदतीत कोणताही आक्षेप अथवा दुरुस्ती प्राप्त न झाल्यास सेवा जेष्टतेबाबत कुणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरुन पदोन्नती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. याबाबत समज देण्यात यावी.

सहपत्र :- सेवाजेष्ठता सुची

( डॉ. प्रियंका नानरवरे )
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग
नागपूर

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभारी अधिकारी/स्था.गु.शा./जि.वि.शा/नियंत्रण कक्ष/बी.डी.डी.एस./श्वॉन पथक/ मोटार परिवहन विभाग/महीला शाखा/सुरक्षा शाखा/पोलीस कल्याण/वाचक शाखा/सायबर शाखा लोहमार्ग नागपूर राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय लोहमार्ग नागपूर